MHPU250030192022

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७००/२०२२ मधील नि.क्र.५ वरील आदेश**

१. फिर्यादी यांनी प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. १ व सोबत दाखल केले प्रतिज्ञापत्रात दुरुस्ती होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. फिर्यादीचे अर्जातील कथनानुसार, मुळ फिर्याद नि.क्र. १ सोबत दाखल केले प्रतिज्ञापत्रात हस्तदोषामुळे पान क्र. ३ वरील परिच्छेद कलम ५ मध्ये चेक क्र. ७८४८४८ ऐवजी ७८४४४८ व पान क्र. ५ वर ७८४८४७ ऐवजी ४८४८४७ व त्यापुढे र.रु.२,५५,०००/— मध्ये एक शुन्य नजरचूकीने कमी नमूद करणेत आलेला आहे. सदरची दुरुस्ती मुळ फिर्यादीचे कामी होणे आवश्यक असून त्यामुळे फिर्यादीमध्ये कोणताही बदल होणार नाही अथवा आरोपीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट फिर्यादीस मुळ फिर्यादीचे कामकाज पुढे चालवणे सुलभ होणार असल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

३. फिर्यादीतर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतची फिर्याद आरोपी क्र. १ विरुध्द चलनक्षम दस्ताऐवज कायदा कलम १३८ अन्वये दाखल केलेली आहे. फिर्यादीने प्रस्तुत अर्जाद्वारे मागीतलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून सदर दुरुस्तीमुळे आरोपीवर अन्याय होणार नाही. याउलट सदरची दुरुस्ती नामंजूर केलेस फिर्यादीचे कामकाज गुणदोषांवर निर्गत होणेस अडचण निर्माण होउ शकते. प्रस्तुत अर्जातील कथनांचे सत्यतेकरीता फिर्यादीने नि.क्र. ६ वर स्वत:चे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. फिर्यादीस केवळ मुळ फिर्याद नि.क्र. १ मध्ये दुरुस्ती करता येईल व त्याअनुषंगाने दुरुस्त फिर्यादीचे स्वतंत्र प्रतिज्ञापत्र दाखल करता येईल. अशा परिस्थितीत फिर्यादीने अर्जाद्वारे मागितलेली दुरुस्ती मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असून त्यामुळे आरोपीचे कोणतेही नुकसान होणार नसून मुळ फिर्यादीचे स्वरुपात बदल होणार नाही. सबब फिर्यादी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

<u>**आदेश**</u>

१. फिर्यादीचा निशाणी क्र. ५ वरील अर्ज मंजुर करणेत येतो.

२. फिर्यादीने मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही १४ दिवसांचे आत करुन तशी मुळ फिर्याद दुरुस्ती प्रत याकामी सादर करावी.

३. फिर्यादीसोबत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात दुरुस्ती करणेची मागणी नामंजूर करणेत येते. फिर्यादीने मुळ फिर्याद दुरुस्ती केलेनंतर त्याबाबत स्वतंत्र प्रतिज्ञापत्र सादर करावे.

४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRATAP VISHNU SAPAKAL
Date: 2023.05.06 15:50:29 +0530

(पी.व्ही. सपकाळ)

दि. ०६/०५/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, जुन्नर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Shri. P.V. Sapkal<br>J.M.F.C. Junnar. |
| Name of Steno | :- | Y.K.Kotasthane (LG) |
| Date of Decision judgment/order | :- | 06/05/2023 |
| Signed by Presiding Officer On | :- | 06/05/2023 |
| judgment/order upload on | :- | 06/05/2023 |